<u>नियमीत मुकदमा क्र. ३५२/२०१२</u>.

बाळासाहेब सिताराम पवार – वादी
वि.
जयसिंग निवृत्ती पवार व इतर – प्रतिवादी.

**नि.क्र. ५ व २७ ला अनुक्रमे वादी व प्रतिवादींतर्फे**
**<u>दाखल तुर्तातुर्त मनाई अर्जावरील हुकूम</u>.**

१. प्रस्तुतचे अर्ज वादी व प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता हुकूम ३९ नियम १ प्रमाणे तुर्तातुर्त व मनाईसाठी दाखल केले आहेत.

२. **दावा मिळकतीमधील** वादीच्या वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत करु नये व दावा मिळकत पाडू नये अशी प्रतिवादींना निरंतर ताकिद होण्यासाठी दाखल केलेल्या दाव्यामध्ये वादीने नि.क्र. ५ च्या अर्जाने प्रतिवादींच्या विरुध्द अशाच स्वरुपाची तुर्तातुर्त मनाई मागितली आहे. तर,

३. प्रतिदावा मिळकतीमधील त्यांच्या वहिवाटीस वादीने हरकत करु नये अशी वादीस निरंतर ताकिद होण्यासाठी दाखल केलेल्या प्रतिदाव्यामध्ये प्रतिवादींनी नि.क्र. २७ च्या अर्जाने वादी विरुध्द अशाच स्वरुपाची तुर्तातुर्त मागितली आहे.

४. **<u>दावा मिळकतीचे वर्णन</u>** – मणेराजुरी, तालुका तासगांव येथील मिळकत गट क्र. ४०७५ मधील मालमत्ता क्र. ३९८०, बांधीव क्षेत्र १२० चौरस फुट व मोकळी जागा अशी एकुण ५५०० चौरस फुटाची मिळकत.

याशी चतुःसिमा – पुर्वेस – मणेराजुरी – सांगली रोड – दक्षिणेस सचिन किसन पवार यांची मिळकत पश्चिमेस – विनायक बाळकृष्ण पवार यांची मिळकत आणि उत्तरेस – कुंडलीक आण्णासो पवार यांची जमिन. याप्रमाणे दावा मिळकत आहे.

५. **दाव्याचा सारांश** – वादीच्या केसनुसार, दावा मिळकत ही त्याची व त्याचे भाउ धोंडीराम व प्रकाश यांच्या वडिलार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत आहे. वादीने दावा मिळकतीत घर बांधले असुन, त्याचा मालमत्ता घर क्र. ३९८० आहे आणि त्या ठिकाणी वादीची वखार आहे. प्रतिवादींचा दावा मिळकतीत कोणताही हक्क, हितसंबंध नाही. दिनांक ०१.०९.२०१२ रोजी प्रतिवादीं व तर्फे इसमांनी दावा मिळकतीत प्रवेश करुन वादीच्या वहिवाटीस हरकत केली आणि वादीस दावा मिळकतीतून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. सबब, दावा मिळकतीमधील वादीचे वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत करु नये व दावा मिळकत पाडु नये अशी प्रतिवादींना निरंतर ताकिद होणेसाठी हा दावा आहे.

६. प्रतिवादींनी नि.क्र. २५ वर त्यांची कैफियत दाखल केली आहे आणि दावा व त्यामधील कथने स्पष्टपणे नाकारली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार दिनांक २३.०४.१९९६ इ. रोजी त्यानी वादी व प्रकाश पवार यांचेकडून मणेराजुरी येथील गट क्र. ४०७५ मधील ११ आर. क्षेत्राची मिळकत (प्रतिदावा मिळकत) खरेदी घेतलेली आहे आणि तेव्हांपासून त्या मिळकतीत त्यांची मालकी हक्काची कब्जे वहिवाट आहे. सन २००० मध्ये त्या ठिकाणी घर बांधलेले आहे. त्याचा मालमत्ता क्र. ३९७९ आहे. कोणताही हक्क, अधिकार नसताना केवळ गट क्र. ४००५ च्या ७/१२ पत्रकी राहिलेल्या पोकळ नोंदीचा गैरफायदा घेवून, वादीने खोटा दावा केला आहे, तो नामंजुर व्हावा असे प्रतिवादींचे म्हणणे आहे आणि पुढील प्रमाणे प्रतिदावा आहे.

७. **प्रतिदावा मिळकत** – मौजे मणेराजुरी, तालुका तासगांव येथील गट क्र. ४०७५, क्षेत्र ०.३३ आर पैकी ५ आणे ४ पै म्हणजे ११ आर क्षेत्राची, मिळकत क्र. ३९७९ सह असणारी मिळकत.

यासी चतुःसिमा – पुर्वेस – रस्ता, पश्चिमेस – विनायक बाळकृष्ण पवार यांची मिळकत, दक्षिणेस – सचिन किसन पवार यांची मिळकत व उत्तरेस – कुंडलीक आण्णा पावार यांची मिळकत. याप्रमाणे प्रतिदावा मिळकत आहे.

८. **<u>प्रतिदाव्याचा सारांश</u>** – प्रतिवादींच्या प्रतिदाव्यानुसार, दिनांक ३०.०४.१९९६ ई. रोजी प्रतिवादी क्र. २ विवेकानंद याने गट क्र. ४०७५ मधील ५ आणे ४ पै ची म्हणजे ०.११ आर क्षेत्राची मिळकत वादी बाळासो व त्याचा भाउ प्रकाश पवार याचेकडुन खरेदी घेतलेली आहे, आणि तेव्हापासुन त्यामध्ये त्यांची मालकी हक्काची वहिवाट होती व आहे. सन २००० मध्ये त्या ठिकाणी घर बांधले आहे, त्याचा मिळकत क्र. ३९७९ आहे. वादी बाळासो हा प्रतिवादींना प्रतिदावा मिळकतीतुन हाकलुन लावणेचा प्रयत्न करीत आहे. सबब, प्रतिदावा मिळकतीतील त्यांच्या कब्जे वहिवाटीस वादी व तर्फे इसमांनी हरकत, अडथळा करु नये अशी वादीस निरंतर ताकिद होणेसाठी हा प्रतिदावा आहे.

९. *<u>वादीने प्रतिदाव्यास दिलेल्या कैफियतीचा सारांश</u>* – वादीचे म्हणण्यानुसार (नि.३१) त्याने दिनांक २३.०४.१९९६ रोजी गट क्र.४०७५ मधील ५ आणे ४ पै चा हिस्सा प्रतिवादींना खरेदी दिलेला नव्हता व नाही. तसेच, चुक दुरुस्ती लेखही करुन दिलेला नाही. कथित खरेदीपत्राने फेरफार होवून प्रतिवादींचे नावाची नोंद सात बारा रेकॉर्डसदरी झालेली नाही. प्रतिदावा मिळकतीत प्रतिवादींची कब्जे वहिवाट नव्हती व नाही. गट क्र. ४०७५, क्षेत्र ११ आर मध्ये वादीची ५५०० चौरस फुटाची मिळकत आहे व त्यामध्ये त्याचे घर मिळकत क्र. ३९८० आहे. या म्हणजे दावा मिळकतीत वादीची कब्जे वहिवाट होती व आहे. तिच्याशी प्रतिवादींचा कोणताही हक्क संबंध नाही. सबब, प्रतिवादींचा प्रतिदावा व तुर्तातुर्त ताकिद अर्ज नामंजुर करावा असे वादीचे म्हणणे आहे.

१०. वादी, प्रतिवादींची प्रतिकथने व वादी प्रतिवादीतर्फे सादर कागदपत्रे, शपथपत्रे वाचली. वादी प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. या अर्जाच्या

निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात, ज्यांचे निष्कर्ष सुसंगत कारणमिमांसे सहीत पुढीलप्रमाणे आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस सकृतदर्शनी केस आहे काय? | नकारार्थी. |
| २. | प्रतिवादींना सकृतदर्शनी केस आहे काय? | नकारार्थी. |
| ३. | न्यायाचे समतोलत्व कोणाचे बाजूने आहे? | कोणचेही बाजुने नाही. |
| ४. | नि.क्र. ५ चा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय? | नकारार्थी. |
| ५. | नि.क्र. २७ चा अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | नकारार्थी. |
| ६. | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

### मुद्दा क्रमांक १ व २ बाबत.

११. नि.क्र. १२ ला दाखल मौजे मणेराजुरी ता. तासगांव येथील गट क्र. ४०७५ एकुण क्षेत्र ०.३३ आर या जमिनीपैकी २ आणे ८ पै हिशाची जमिन वादी बाळासो याच्या नावावर आहे आणि वादी बाळासो याचे नाव इतर अधिकारात दर्शविलेले आहे. त्या अनुषंगाने नि.क्र. १३ ला दाखल नमुना क्र. ८ चे खाते उता–यास वादी बाळासोचे नावावर गट क्र. ४०७५ मधील साडे पाच आर क्षेत्र आहे. नि.क्र. १४ ला दाखल फेरफार क्र. १४६२९ या फेरफारातून वादी बाळासो याने गट क्र. ४०७५ मधील त्याच्या नावावरील क्षेत्र आणि त्याच्या इतर जमिनी

मणेराजुरी वि.का.स. सोसायटीस तारण देवून कर्ज घेतल्याचे दिसते. नि.क्र. १० ला दाखल सन २००९–२०१० ते २०१४–२०१५ या वर्षासाठीच्या असेसमेंट लिस्टमध्ये गट क्र. ४०७५ या जमिनीमध्ये घर मिळकत क्र. ३९८० असल्याचे आणि ती घर मिळकत धारण करणा–याचे नाव सदरी वादी बाळासोचे नावाची नोंद आहे. नि.क्र. ३७ सोबत अ.क्र. १ ला दाखल कराच्या पावतीनुसार घर क्र. ३९८० चा कर वादीने भरला आहे. नि.क्र. ३२ सोबत अ.क्र. १ ते ३ ला दाखल वादीतर्फे साक्षीदार रामचंद्र, विठ्ठल आणि आनंदा पवार यांनी **दावा मिळकतीध्ये** वादीची कब्जे वहिवाट होती व आहे आणि दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींची वहिवाट नव्हती व नाही असे सांगितले आहे. तर नि.क्र.३ अ.क्र. ८ ला दाखल कागदापत्रातुन वादीने दिनांक ०१.०९.२०१२ रोजी प्रतिवादींचे विरुध्द तासगाव पोलीस ठाण्याकडे तक्रार केल्याचे दिसुन येते.

१२. प्रतिवादींच्या केसप्रमाणे, नि.क्र. २९ अ.क्र. १ व २ ला दाखल खरेदीखतातुन आणि चुक दुरुस्ती दस्तातुन वादी बाळासो व त्याचा भाउ प्रकाश पवार यांनी मणेराजुरी येथील गट क्र. ४०७५ एकुण क्षेत्र ०.३३ आर पैकी त्यांचा ५ आणे ४ पै चा हिस्सा म्हणजे ०.११ आर क्षेत्राची जमिन प्रतिवादी क्र. २ विवेकानंद यास विक्री केल्याचे दिसते. नि.क्र. ४० व ४१ ला दाखल सन २०१०–२०११ ते २०१४–२०१५ साठीच्या घर क्र. ३९७९ च्या कर आकारणी यादीमध्ये सदरची घर मिळकत क्र. ३९७९ ही मिळकत गट क्र. ४०७५ मध्ये दर्शविली असुन धारण करण–याचे नाव सदरी प्रतिवादी क्र. २ विवेकानंदचे नांव दर्शविले आहे. नि.क्र.२९ अ.क्र. ४ ला दाखल पावतीनुसार प्रतिवादी क्र. २ विवेकानंदने घर क्र. ३९७९ चा कर भरल्याचे दिसते. नि.क्र. ३९ अ.क्र. ५ ते ७ ला प्रतिवादीतर्फे साक्षीदार दिनकर, चंद्रकांत व प्रशांत पवार यांनी त्यांचे शपथपत्रामध्ये **प्रतिदावा मिळकतीत** प्रतिवादींची कब्जे वहिवाट होती व आहे आणि त्यामध्ये वादी बाळासोची कब्जे वहिवाट नसल्याचे सांगितले आहे.

१३. नि.क्र. ३९/३ ला दाखल कागदातुन प्रतिवादी क्र. २ विवेकानंद याने दिनांक ११.०९.२०१२ रोजी तहसिलदार, तासगांव यांचेकडे खरेदीदस्ता प्रमाणे व चुक दुरुस्ती लेखाप्रमाणे गट क्र. ४०७५ च्या सात बारा रेकॉर्ड सदरी त्याच्या नावाची नोंद होणेसाठी अर्ज केल्याचे दिसते. तत्पुर्वीच दिनांक ३०.०८.२०१२ रोजी वादी बाळासो याने नि.क्र. ३/५ ला दाखल हरकतीप्रमाणे प्रतिवादी क्र. २ चे खरेदी व्यवहाराची नोंद करण्यास हरकत घेतल्याचे दिसते. सदरचे दोन्ही दस्त हे नोंदणीकृत आहेत. वादी बाळासो याने त्याच्या कैफियतीमध्ये गट क्र. ४०७५ पैकी ०.११ क्षेत्राचा खरेदी विक्रीचा व्यवहार नाकारला आहे. परंतु, त्याने त्याचे दाव्यात त्या दस्तांना आव्हान दिलेले नाही. खरेदीदस्तामध्ये खरेदी तारखेसच जमिन खरेदी देणार वादी बाळासो व त्याचा भाउ प्रकाश याने प्रतिवादी क्र. २ विवेकानंद याच्या कब्जात जमिन दिल्याचा उल्लेख आहे. पुढे दिनांक १०.०८.१९९८ रोजी चुक दुरुस्ती दस्त होवून खरेदी दस्तामध्ये ४७५ असा चुकीचा लिहीलेला गट क्रमांक ४०७५ लिहुन दुरुस्त झाला आहे. खरेदीदस्त व चुक दुरुस्ती दस्त नोंदणीकृत आहेत व त्यामध्ये वादी व त्याचा भाउ प्रकाश याने खरेदी दिलेल्या जमिनीचा कब्जा प्रतिवादी क्र. २ विवेकानंद यास दिल्याचा उल्लेख आहे. परिणामी या अंतरिम टप्प्याला इतर कागदपत्रांना महत्त्व देवून वादीची केस मान्य करता येणार नाही. सबब, वादीस सकृतदर्शनी केस नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

१४. त्याचप्रमाणे वादी बाळासो व त्याचा भाउ प्रकाश याने प्रतिवादी क्र. २ विवेकानंद यास दिनांक २३.०४.१९९६ व १०.०८.१९९८ रोजी लिहुन दिलेल्या खरेदी दस्ताचा व चुक दुरुस्ती दस्ताचा अंमल होवून अदयाप फेरफार मंजुर झालेला नाही. परिणामी गट क्र. ४०७५ पैकी वादी व त्याचा भाउ प्रकाशकडुन खरेदी घेतलेल्या ५ आणे ४ पै चे हिशास म्हणजे ०.११ आर क्षेत्रास प्रतिवादी क्र. २ विवेकानंदच्या नावाची नोंद सात बारा रेकॉर्ड सदरी झालेली नाही. आजही

खरेदी दिलेले सदरचे क्षेत्र वादी व त्याचा भाउ प्रकाश यांच्या नावावरच आहे. अशा परिस्थितीत या अंतरिम टप्प्याला प्रतिवादींचीही केस मान्य करता येणार नाही. थोडक्यात वादी प्रमाणे प्रतिवादींनाही सकृतदर्शनी केस नाही असे माझे स्पष्ट मत आहे. सबब मुद्दा क्र. १ व २ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी आहेत.

**मुद्दा क्रमांक ३ बाबत –**

१५. वादी व प्रतिवादींना सकृतदर्शनी केस नाही, त्यामुळे न्यायाचे समतोलत्व त्यांच्या कोणाच्याही बाजुने नाही असा मुद्दा क्र. ३ बाबत माझ निष्कर्ष आहे.

१६. **मुद्दा क्रमांक ४ व ५ बाबत –**

वादी व प्रतिवादींना सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचे समतोलत्व त्या दोघांच्याही बाजुने नाही. परिणामी त्या दोघांनी अंतरिम मनाईसाठी एकमेकांच्या विरुध्द दाखल केलेले अर्ज नामंजुर केल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होणार नाही. सबब, मुद्दा क्र. ४ व ५ माझे निष्कर्ष नकारार्थी आहेत आणि पुढील प्रमाणे आदेश आहे.

**आ दे श**

१. वादीचा नि.क्र. ५ चा अर्ज नामंजुर केलेला आहे.

२. प्रतिवादींचा नि.क्र. २७ चा अर्ज नामंजुर केलेला आहे.

३. या अर्जांचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट राहिल.

सही.
(ए.ए.चेंडके )
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
**तासगांव**.

**तासगांव**
दिनांक २०.११.२०१३.